ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३० पुणें, बुधवार, ५ फेब्रुवारी, १९६४ अंक ३

## विविध माहिती

**शतायुषी माणसांची संख्या**—१९६१ मध्यें करण्यांत आलेल्या शिरगणतींत अशी माहिती उपलब्ध झाली आहे कीं, भारतांत एकूण ७७ हजार माणसांनीं १०० वर्षांचें आयुर्मान ओलांडलें आहे. त्यांपैकीं २२४ माणसें नागपूर शहरांत आहेत. ७० पुरुष आणि १५४ स्त्रिया असें त्यांचें प्रमाण आहे. ह्या वृद्धांचा सत्कार करण्याचा नागपूर कॉर्पोरेशनचा विचार आहे. १९६१ नंतर आणखीहि कांहीं माणसें १०० वर्षें वयाच्या पुढें गेलीं असण्याचा संभव आहे.

**मुलांसाठी ज्ञानकोष**—तामीळ ॲकेडमीनें मुलांसाठी तामीळ भाषेंत एक ज्ञानकोष संपादन करून प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठीं सुमारें ११·४३ लाख रुपये खर्च येणार असून त्यांपैकीं ५० टक्के खर्च भारत सरकार करणार आहे. राज्य सरकार २५ टक्के खर्च देणार आहे. राज्य सरकारकडून येणारी रक्कम दरसाल ५० हजार रु. ह्याप्रमाणें ४ वर्षांत देण्यांत येणार आहे.

**अधिक ऊंस पिकविण्याची सोय**—नगर जिल्ह्यांतील अशोक सहकारी कारखान्यानें उसाची लागवड वाढविण्यासाठीं कारखान्याच्या परिसरांतील ४५ खेड्यांत ५० मोठ्या व ४५० छोट्या विहिरी खोदण्याचें ठरविलें आहे. कारखान्याचा विस्तार करण्यांत येणार असल्यानें त्याला अधिक उसाची गरज लागणार आहे. ह्या कामासाठीं भूतारण बँकेकडून कर्ज मिळविण्याची खटपट चालू आहे.

**मद्रास शहरांतील रिक्षा जाणार**—मद्रास शहरांतील सर्व प्रकारच्या रिक्षा बंद करण्यांत येणार आहेत. हातानें ओढावयाच्या आणि सायकलरिक्षा तर रद्द होतीलच; पण यांत्रिक रिक्षाहि बंद करण्यांत येणार आहेत. मद्रासमधील वाहतूक वेगानें जाणारी असून ह्या धांवपळींत रिक्षांचा टिकाव लागण्यासारखा नाहीं. शिवाय यांत्रिक रिक्षांमुळें अपघातहि अधिक होण्याचा संभव असतो.

**नागपुरी संत्र्यांची निर्यात**—रशिआंतील ओडेसा येथील व्यापारी संघटना नागपुरी संत्र्यांची आयात करण्याचा विचार करीत आहे. नागपूर येथील संत्र्यांच्या बागाइतदारांच्या संघटनेतर्फे कांहीं माल नुकताच रशिआला पाठविण्यांत आला होता. हा माल रशिआच्या व्यापारी संघटनेला पसंत पडला आहे. नागपूरचीं संत्रीं निर्यात करण्याची शक्यता अजमावण्यासाठीं महाराष्ट्र राज्य सहकारी मार्केटिंग सोसायटीचे मॅनेजिंग डायरेक्टर रशिआला जाऊन आले. इटली व फ्रान्सला माल निर्यात करण्याच्या दृष्टीनेंहि विचार करण्यांत येत आहे.

**जर्मन शास्त्रज्ञांवर निर्बंध**—जर्मन शास्त्रज्ञांनीं शस्त्रास्त्रें निर्माण करण्याच्या कामीं परदेशांशीं सहकार्य करूं नये असा निर्बंध घालणारा कायदा पश्चिम जर्मनीचें पार्लमेंट करणार आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अनेक जर्मन शास्त्रज्ञ परदेशांत स्थायिक झालेले आहेत. विशेषतः मध्यपूर्वेतील मागासलेल्या देशांत त्यांनीं चांगलें बस्तान बसविलें आहे. फ्रान्सच्या अणुबाँबनिर्मितीच्या कार्यक्रमाला जर्मन शास्त्रज्ञ मदत करीत आहेत अशीहि बोलवा आहे. निर्बंध घालणारा कायदा मंजूर झाल्यावर परदेशांतील जर्मन शास्त्रज्ञांना तो कसा काय लागू केला जाणार हा प्रश्नच आहे.

**कृत्रिम रबराचा दुसरा कारखाना**—दोन हिंदी कंपन्यांनीं दोन अमेरिकन कंपन्यांचें साह्य घेऊन भारतांत कृत्रिम रबर तयार करण्याचा दुसरा कारखाना काढण्याची तयारी दाखविली आहे. संकल्पित कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता २० हजार टनांची असेल. अशा प्रकारचा पहिला कारखाना उत्तर प्रदेशांत बरेली ह्या ठिकाणीं काढण्यांत आला असून, त्याची उत्पादनक्षमता ३० हजार टनांची आहे. मुंबईजवळील ट्रॉंबे येथील तेलशुद्धीच्या कारखान्यांतून नव्या रबराच्या कारखान्याला जरूर असणारा कच्चा माल पुरविण्यांत येणार असल्यानें कारखाना मुंबईजवळ निघण्याची शक्यता आहे.

**नागपूरची दूधयोजना**—नागपूरच्या दूधपुरवठा योजनेनें आतां एक नवीन स्वयंचलित यंत्र बसविलें आहे. ह्या यंत्राच्या साह्यानें दर तासाला २ हजार लिटर दूध निर्जंतुक करतां येतें. महाराष्ट्रांतील फक्त हीच दूधपुरवठा योजना ग्राहकांच्या घरोघरीं दूध पोंचवितें. गाईचें दूध पुरविण्याची सोय हा ह्या योजनेचा एक विशेष आहे. नागपूरची दूधपुरवठा योजना सुरू झाली तेव्हां म्हणजे १९५८ सालीं तिच्यामार्फत फक्त ८५० लिटर दूध दररोज पुरविण्यांत येत असे. आतां तिचा व्याप पुष्कळच वाढलेला आहे.

**रशिआ क्यूबाची साखर घेणार**—१९६५ ते १९७० ह्या काळांत रशिआ क्यूबाकडून २·४ कोटी टन साखर विकत घेणार आहे. साखरेच्या दर पौंडाची किंमत ६ सेंटस ठरविण्यांत आली आहे. जागतिक बाजारपेठेंतील साखरेची किंमत दर पौंडाला १०·८४ सेंटस् आहे. क्यूबाला जरूर असणाऱ्या वस्तू निर्यात करून साखरेची किंमत देण्यांत येणार आहे. वास्तविक रशिआ स्वतःची गरज भागविण्याइतकी साखर निर्माण करून शिवाय ती निर्यातहि करूं शकतो. तथापि, क्यूबासंबंधीं रशिआला वाटणाऱ्या बंधुत्वाच्या भावनेच्या पोटीं हा व्यवहार करण्यांत येणार आहे.

## हातभट्टीच्या धंद्यावर प्रकाश

### श्री. अच्युत रानडे ह्यांची उद्बोधक पाहणी

दारूच्या गुन्ह्याबद्दल येरवडा तुरुंगांत शिक्षा भोगत असलेल्या १०३ कैद्यांची २ जुलै, १९६३ ते १९ जुलै, १९६३ ह्या मुदतींत, टेकचंद कमिटीच्या विनंतीवरून श्री. अच्युत रानडे ( नवजीवन मंडळाचे ऑनररी सेक्रेटरी ) ह्यांनीं पाहणी केली. सर्वच सर्व १०३ कैद्यांनीं, "पोलिसांना ठराविक हप्ते द्यावे लागतात" असें सांगितलें. "आतां धंद्यांत फारशी कूस उरलेली नाहीं; मलई सर्व पोलिसच घेतात" असेंहि त्यांनीं एकमतानें नमूद केलें. दररोज चार गॅलन दारू गाळणाराला दरमहा सुमारे ३०० रु. पोलिसांना द्यावें लागतात, अशा सुमारें १०० हातभट्ट्या पुणें शहरांत आहेत, असा अंदाज आहे.

दारूची वाहातूक करण्याबद्दल कैद भोगीत असलेल्या ४९ कैद्यांपैकी २८ 'बकरे' होते; म्हणजे पोलिसांनीं त्यांना बळी दिले होते, असें ते म्हणतात. उरलेल्या २१ जणांचा तो उघड उघड धंद्याच होता. ते दारू इकडून तिकडे पोचवीत असत किंवा दुकानांत ती विकत असत. आपल्या मालकांना ५००% नफा सुटत असला पाहिजे, असें त्यांचें मत आहे.

"आपला हा बेकायदेशीर धंदा आपल्या शाळकरी मुलां-पासून लपविण्याची त्या धंद्यांतील विधवा मात्र अतिशय दक्षता घेतात. त्याच्या प्राप्तींतून त्या आपल्या मुलांचें शिक्षण व पालन करतात." असेंहि श्री. अच्युत रानडे ह्यांनीं नमूद केलें आहे.

कैद्यांनीं पुरविलेल्या माहितीचा प्रसिद्ध झालेला हा सारांश आहे; ही माहिती कितपत सत्य आहे, हें सांगणें कठीण आहे. पकडलेल्या गुन्हेगारांनीं स्वतःच्या बचावासाठी पोलिसांवर शिंतोडे उडविणें अस्वाभाविक नाहीं हें लक्षांत ठेवायला हवें.

### साखरेचें उत्पादन अंदाजापेक्षा ८ लक्ष टन कमी ?

चालू मोसमांत ( १९६३–६४ ) साखरेचें उत्पादन फक्त २५·३ लक्ष टनच होईल, असा इंडियन शुगर मिल्स असोसि-एशनचा अंदाज आहे. सरकारी अंदाज ३३ लक्ष टन उत्पाद-नाचा आहे. म्हणजे सुमारें ८ लक्ष टन साखर कमी निर्माण होईल. वाढत्या दरानें उसाची खरेदी करणें उत्तरेकडील कारखान्यांना परवडत नाहीं, गूळ आणि खांडसारीवाले जास्त किंमत देऊं शकतात. मागील वर्षाइतक्या उत्पादनावर ( २१·६६ लक्ष टन ) भाव नियंत्रण असावें, त्यापेक्षा जास्त होणारी साखर भारी दरानें विकण्याची कारखान्यांना मुभा असावी, म्हणजे उत्पादनवाढीस प्रोत्साहन मिळेल, अशी असोसिएशनची सूचना आहे.


भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ९·९९ लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | १४·०४ " |
| ठेवी | रु. | ३९२·१९ " |
| खेळतें भांडवल | रु. | ४३४·०० " |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें व बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकद्वरी लेन, मुंबई ४.



स्थापना १९१८

ALCO



रु. १००–०० तुम्हीं आज गुंतवले, तर

तीन वर्षांअखेर त्याचे

रु. ११३–५० तुम्हांला मिळतील

दि बेळगांव बँक कॅश--सर्टिफिकेटांत पैसे गुंतवा

आणि

द. सा. ४½% व्याज ठेव परत घेतांना मिळवा.

( जरूर पडली, तर मुदतीपूर्वी तुम्हीं रक्कम परत घेऊं शकता; तुमच्या ठेवीची संपूर्ण रक्कम मिळून वर कांहीं व्याजहि पण मिळेल. )

[ सर्टिफिकिटें वेगवेगळया रकमेचीं दिलीं जातात. ]

आमच्या कोणत्याहि कचेरींत चौकशी करा

# दि बेळगांव बँक लिमिटेड

स्थापना—१९३० ] [ शेड्यूल्ड बँक

— रजिस्टर्ड ऑफिस —

रविवार पेठ, बेळगांव.

म्हैसूर आणि महाराष्ट्र राज्यांत शाखा विस्तार



★ सहकाराच्या क्षेत्रांत केलेल्या कामगिरीचा महाराष्ट्राला अभिमान वाटतो ★

# महाराष्ट्र राज्य सहकारी बँक लि.

*सुद्धां आपल्या ५१ वर्षांवरील सेवेचा अभिमान बाळगते.*

| | | |
|---|---|---|
| भरपाई झालेलें भांडवल | ... | ४ कोटी ५६ लाख |
| गंगाजळी व फंड | ... | १ कोटी २६ लाख |
| ठेवी | ... | ३० कोटी ११ लाख |
| खेळतें भांडवल | ... | ६५ कोटी ६१ लाख |

महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेंत वाढत्या प्रमाणांत ठेवी ठेवून राज्यांतील शेतकऱ्यांना साहाय्य करण्यास आम्हांला मदत करा.

निरनिराळ्या आकर्षक योजनांसाठी तुमच्या नजिकच्या महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेच्या कोणत्याहि शाखेकडे चौकशी करा.

: मुख्य कचेरी : ९, बेक हाऊस लेन, फोर्ट मुंबई.

: प्रादेशिक कचेरी : महाल : नागपूर.

टेलिफोन नं. २५५४७४–७५, २५६२१४

बृहन्मुंबईतील शाखा : ( १ ) भायखळा ( २ ) गोरेगांव ( ३ ) खार ( ४ ) लालबाग ( ५ ) प्रभादेवी ( ६ ) विलेपार्लें ( ७ ) सांताक्रूझ ( ८ ) मुलुंड ( ९ ) चेंबूर (१०) माहीम

# अर्थ

बुधवार, ५ फेब्रुवारी, १९६४





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## ठेवींच्या जाहिरातींवर बंधनें

### ग्रेट ब्रिटनमधील नवा कायदा

बँकांना ठेवींची कमतरता पडत असतांना, ठेवींचा ओघ बिगर-बँक संस्थांकडे चालू आहे. वेगवेगळे कारखाने व उद्योगधंदे ठेवी स्वीकारून आपल्या खेळत्या भांडवलाची गरज भागवीत आहेत. ह्या ठेवींवर भारी दरानें व्याज दिलें जातें; बँकांचा व्याजाचा दर त्यामानानें पुष्कळच कमी असतो. अशा ठेवी स्वीकारणाऱ्यांवर रिझर्व्ह बँकेचा कांहींच अधिकार चालत नाहीं, आणि मोठ्या प्रमाणावरील ह्या ठेवींमुळें बराचसा पैशाचा पुरवठा रिझर्व्ह बँकेच्या कक्षेबाहेर राहतो. ह्यावर उपाययोजना म्हणून सुरवातीला ठेवींची माहिती रिझर्व्ह बँकेला पुरविण्याची त्यांचेवर कायद्यानें सक्ति करण्यांत येणार आहे. तूर्त तरी प्रत्यक्ष हस्तक्षेप करण्याचा विचार नाहीं. बँकिंगच्या क्षेत्राबाहेर खूप पैसा खेळत आहे, तो बँकांकडे कसा खेंचता येईल, हा प्रश्न आहे. बँकांची कर्जे देण्याची शक्ति वाढावयाची असेल, तर त्यांचेकडे ठेवी भरपूर यायला हव्यात. बँकांकडील ठेवींना विम्याचें आणि रिझर्व्ह बँकेच्या देखरेखीचें जसें संरक्षण असतें, तसें इतर ठिकाणच्या ठेवींना नसतें. व्याजाच्या आशेनें किंवा इतर प्रलोभनानें ठेवीदारांचें नुकसान होण्याची भीति असते.

बँकिंगच्या क्षेत्राबाहेरलि ठेवींच्या संरक्षणाचा प्रश्न ग्रेटब्रिटन-मध्येहि उपस्थित झाला आहे. अशा ठेवीदारांच्या संरक्षणाची चर्चा गेलीं सात–आठ वर्षें चालू होती. मँचेस्टर येथील कांहीं कंपन्यांतील ठेवी बुडाल्या तेव्हां ह्या प्रश्नाकडे लोकांचें विशेष लक्ष वेधलें गेलें. १९५९ सालीं राणीच्या भाषणांत त्याचा उल्लेख आला, १९५९ च्या निवडणुकीचे वेळीं त्याला महत्त्वाचें स्थान प्राप्त झालें. आतां पार्लमेंटनें कायदा करूनच अशा ठेवी स्वीकारण्याचे बाबतींत कांहीं नियम घालून दिलें आहेत; १० आक्टोबर, १९६३ पासून ते अंमलांत आले. 'प्रोटेक्शन' ऑफ डिपॉझिटर्स 'ॲक्ट'चा उद्देश ठेवी घेणारांच्या व्यवहारांना उजेडांत आणणें हा आहे. वर्षांतून ठराविक वेळीं आपले तपशीलवार हिशेब प्रसिद्ध करण्याची त्यांचेवर सक्ती करण्यांत आली आहे. त्यामुळें तज्ज्ञांना तरी त्यांची छाननी करतां येईल आणि बाकीच्यांना ते ज्ञान प्राप्त होऊं शकेल. ठेवीसाठी जाहिराती देणारांना आतां आपले ताळेबंद आणि नफातोटापत्रकें ऑडिट करून घ्यावीं लागतील; कंपनीकायद्यांत त्याविषयीं सांगितलेले सर्व नियम पाळावे लागतील. वेगवेगळ्या ठेवींची परतीची वेळ, परतीच्या वेळेच्या दृष्टीनें ठेवीदारांची संख्या, ठेवींवर दिलेलें व्याज, हें सर्व जनतेला तपासून पाहतां येईल.

"ठेवी स्वीकारल्या जातील" असें सांगणाऱ्या जाहिरातींनीं दिशाभूल होऊं नये, हाहि त्या कायद्याचा उद्देश आहे. उद्योगधंद्याचें स्वरूप, डायरेक्टरांचीं नांवें, कंपनीच्या बँकर्सचीं नांवें, ताळेबंदाची तारीख, हीं सर्व जाहिरातींत नमूद करणें आवश्यक झालें आहे. दिलेल्या पत्त्यावर मागणी केल्यास हा तपशील मिळूं शकेल असें जाहिरातींत छापलें असेल तर प्रत्यक्ष तपशील जाहिरातींत छापला नाहीं तरी चालेल. कमींत कमी किती रकमेवर जाहीर केलेलें व्याज दिलें जाईल, कमीत कमी मुदत किती हवी, परतफेडीसाठी कमींत कमी नोटीस किती हवी, हेंहि सांगितलें पाहिजे. कंपनीचें वसूल भांडवल नमूद करायला हवें; प्रत्यक्ष वस्तुस्थितीपेक्षा कंपनी मोठें असल्याचा आभास निर्माण होता कामा नये. जिंदगीचा आकडा दिला तर तितक्याच मोठ्या टाइपांत देणींहि छापलीं पाहिजेत.

ह्या नियमांमुळें फर्म्सना धोका असणाऱ्या उपक्रमासाठी ठेवी मिळवणें कठीण होणार आहे. अर्थात, धंदा नुकसानींत येण्यास वेळ लागत नाहीं आणि कारभार कार्यक्षमतेचा असेलच अशी खात्री देता येत नाहीं. ठेवीदारांना आपण कोणत्या प्रकारच्या धंद्यांत पैसे ठेवत आहों, हें कळण्यास मात्र नियमांचा उपयोग होईल; तो धंदा फार काळ नुकसानींत चालवितां येणार नाहीं.

ठेवीदारांच्या हितासाठी दोन उपाययोजना शक्य होत्या; एक म्हणजे ठेवी मागणाऱ्या सर्वांसाठी ठराविक नियम घालून देणें — त्यांनीं किती रक्कम तरती ठेवावी, कॅशचें ठेवींशीं प्रमाण काय असावें, वसूल भांडवलाच्या किती प्रमाणांत ठेवी घेता याव्या, इत्यादि. अशा नियमामुळें ठेवी घेणाऱ्या सर्वच फर्म्सच्या कामांत हस्तक्षेप केल्यासारखें होईल, सच्च्या लोकांच्याहि आर्थिक व्यवहारांना खीळ बसेल. दुसरी उपाययोजना म्हणजे जाहिरात देऊन ठेवी घेणारांवर निर्बंध घालून ठेवीदारांची फसवणूक थांबविणें. ह्या योजनेप्रमाणें ज्यांना ठेवीसाठी जाहिराती द्यावयाच्या असतील अशांची यादी बोर्ड ऑफ ट्रेडकडे राहील. आपले हिशेब दाखवून आणि चाचणीस मान्यता देऊनच ह्या यादींत दाखल होणें शक्य होईल. अशा यादीमुळें आणि ठेव घेणाऱ्या फर्म्सच्या वारंवार तपासणीमुळें ठेवीदारांना बरेंच संरक्षण प्राप्त होईल; तथापि सामान्य जनतेला आर्थिक व्यवहारांची जास्त प्रमाणांत माहिती होणें, हाच खरा प्रभावी उपाय आहे. कारण, ठेवी घेणारे ह्या नियमांतूनहि वाट काढण्याचा प्रयत्न करतीलच. आपल्या इकडील वृत्तपत्रांत ठेवींसाठी प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील मजकुरावर अशाच प्रकारचे निर्बंध घातले गेले, तर ठेवीदारांचा फायदा होईल, पण लहान आणि मध्यम आकाराच्या उद्योगधंद्यांना ठेवी मिळणें कठीण जाईल. नव्यानेंच उद्योगधंद्यांत पडणारानें प्रारंभीचें यश किंवा अपयश कुणाच्या पैशानें मिळवावें, हा महत्त्वाचा प्रश्न आहे; नफा मिळविणाऱ्या सुप्रतिष्ठित फर्म्सची गोष्ट वेगळी आहे.

---

## सिगारेट्सच्या जाहिरातींवर बंधनें

सिगारेट ओढल्यानें बरें वाटतें, धूम्रपान हें सामाजिक प्रतिष्ठेचें लक्षण आहे, आधुनिक उच्च राहणीचा तो एक आवश्यक भाग आहे, अशा तऱ्हेच्या वाक्यांना सिगारेट्सच्या जाहिरातींत बंदी करण्याचा अमेरिकन सरकारचा विचार आहे.

## राज्य फायनॅन्स कॉर्पोरेशन्सचीं कर्जें देण्याबाबत धोरणें

राज्य सरकारांच्या फायनॅन्स कॉर्पोरेशन्सच्या प्रतिनिधींची एक परिषद बंगलोर येथें भरविण्यांत आली होती. ह्या परिषदेचें उद्घाटन करतांना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांनीं राज्य सरकारांच्या फायनॅन्स कॉर्पोरेशन्सच्या कर्जें देण्याच्या धोरणाबद्दल कांहीं विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, विकासाच्या कामाला हातभार लावणाऱ्या परदेशांतील बँका काय कार्य करतात ह्यासंबंधीं रिझर्व्ह बँकेतर्फे गेले वर्षभर तौलनिक अभ्यास करण्यांत येत होता. अशा प्रकारच्या अभ्यासाला कांहीं मर्यादा आपोआपच पडतात. परंतु त्या मर्यादा लक्षांत घेऊनहि अभ्यासानें एक गोष्ट साध्य केलेली आहे. ज्या लोकांच्या अगर देशांच्या समोर सामान्यत: भारतासारखेच प्रश्न उपस्थित झालेले आहेत त्यांनीं ते प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न कशा रीतीनें केले हें रिझर्व्ह बँकेनें केलेल्या अभ्यासावरून समजून आलें. अभ्यासावरून एक गोष्ट विशेष लक्षांत आली. मुदतीचीं कर्जें घेतांना ऋणकोकडून कांहीं तारण हें घ्यावेंच लागतें. हें तारण कशा प्रकारचें असावें हें ठरवितांना परदेशांतील विकास बँकांच्या मुख्य अधिकाऱ्याला भारतामधील बँकांच्या अधिकाऱ्यापेक्षा अधिक स्वातंत्र्य असतें. राज्य सरकारांच्या फायनॅन्स कॉर्पोरेशन्सची स्थापना करतांना जो कायदा करण्यांत आला त्यामुळें कर्जें देण्यावर वाजवीपेक्षा अधिक बंधनें घालण्यांत आलीं किंवा काय, ह्यासंबंधीं विचार करण्यांत आला पाहिजे. हे निर्बंध जाचक आहेत असें वाटल्यास धोका न पत्करतां कितपत सैल करतां येतील तें पाहिलें पाहिजे. तथापि हे निर्बंध सैल करतांना राज्यांचा व बॉंड-होल्डर्सचा पैसा धोकादायक रीतीनें गुंतविला जात नाहीं, ह्याकडेहि लक्ष देण्यांत आलें पाहिजे. कॉर्पोरेशनचा कायदा पास झाल्यावर सरकारी क्रेडिट गॅरंटी स्कीम अमलांत आलेली आहे. तीमुळें कर्जें देण्यावरील निर्बंध कांहींसे सैल करणें शक्य झालेलें आहे.

## प्रवाशांसाठी नवें आकर्षण

पाटण्यापासून पूर्वेला ६८ मैलांवर राजगीर हें इतिहासप्रसिद्ध ठिकाण आहे. ह्या ठिकाणीं भगवान् गौतमबुद्धानें आपल्या आयुष्यांतील बरींच वर्षे साधना-चिंतनांत घालविलीं. राजगीरची हवा हिंवाळ्यांत अतिशय आरोग्यदायी असते. शिवाय ह्या ठिकाणीं उष्णोदकाचे झरे आहेत. ह्या झऱ्यांत स्नान केल्यानें आंतड्याचे जीर्ण रोग आणि कातडीचे रोग बरे होतात असें सांगण्यांत येतें. राजगीर ह्या ठिकाणची आकर्षकता वाढविण्याच्या दृष्टीनें आणि आंतरराष्ट्रीय प्रवाश्यांची सोय करण्याच्या दृष्टीनें तेथें आतां अनेक सुधारणा करण्यांत येणार आहेत. बौद्ध धर्माच्या इतिहासांत राजगीरला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याचा फायदा घेऊन परदेशीय चलन मिळविण्याचाहि हेतु ह्या उपक्रमामागें आहे.

## चोरटें सोनें घेण्याचा विक्रम

सौराष्ट्रामधील राजकोट शहरांत भारताबाहेरून चोरट्या मार्गानें आणण्यांत येणाऱ्या सोन्याचा खप सर्वांत अधिक होतो असें वर्तमान आहे. एकट्या राजकोट शहरांत दरमहा ५ लाख रुपये किंमतीच्या सोन्याची खरेदी-विक्री वाममार्गानें होते. राजकोट शहरानंतर जामनगरचा आणि भावनगरचा क्रमांक लागतो. सोन्याची चोरटी आयात करणाऱ्या लोकांतील भांडणांचा फायदा घेऊन लपविलेलें सोनें उजेडांत आणण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत.

## राजकारण अर्थमूल आहे !

कोणत्याहि देशाच्या राजकारणाच्या प्रेरणा कमी-अधिक दूरान्वयानें त्या देशाच्या आर्थिक समस्यांमधून उगम पावलेल्या असतात. विसाव्या शतकांत हा संबंध अधिक स्पष्ट होत चाललेला आहे. ह्याविषयींचें ताजें उदाहरण दक्षिण अमेरिकेंतील चिली ह्या देशाचें घेतां येईल. चिलीच्या सरकारच्या उत्पन्नाचा बराच मोठा म्हणजे सुमारें ३० टक्के हिस्सा तांब्यापासून मिळतो. तांब्याची निर्यात करून त्या देशाला फार मोठ्या प्रमाणावर परदेशिय चलनाची प्राप्ति होते. त्याच्या परदेशीय चलनाच्या एकूण प्राप्तीपैकी दोन तृतीयांश प्राप्ति तांब्याच्या निर्यातीनें मिळते. जगांतील तांब्याच्या खनिजाच्या सांठ्यांपैकी ४० टक्के चिली देशांत आहे. त्या देशांतील तांब्याच्या खाणींपैकी ९० टक्के खाणी अमेरिकन कंपन्यांच्या मालकीच्या आहेत आणि ह्याच कंपन्या सरकारला सर्वांत अधिक कर देत असतात. चिली देशांतील जहाल राजकारणी पक्षांचें म्हणणें असें आहे कीं, देशाची भरभराट व विकास घडवून आणण्यासाठी तांब्यांच्या खाणींचें राष्ट्रीयीकरण करणें आवश्यक झालेलें आहे. ह्या उलट मवाळ आणि प्रागतिक पक्षांच्या मतानें चिलीजवळ राष्ट्रीयीकरण यशस्वी करण्यासाठीं लागणारी साधनसामग्री नाहीं. त्यामुळें खाणींचें राष्ट्रीयीकरण केलें तरी आर्थिक उन्नति न साधतां चालू धंदी बिघडल्यामुळें आर्थिक दुरवस्था ओढवण्याचाच संभव अधिक आहे. ह्या परिस्थितीमुळें अमेरिकन कंपन्या चिलीमध्यें गुंतविल्या जाणाऱ्या भांडवलांत कपात करूं लागलेल्या आहेत. चिलीमधील अध्यक्षपदाची निवडणूक आतां जवळ आलेली असल्यामुळें अमेरिकन मालकीच्या तीन मोठ्या कंपन्यांच्या राष्ट्रीयीकरणाच्या प्रश्नाला आगळेंच महत्त्व प्राप्त झालें आहे. चिलीच्या राजकारणांत उत्पन्न झालेल्या ह्या खळबळाटाचें रहस्य अशा रीतीनें त्या देशाच्या आर्थिक समस्यांपर्यंत जाऊन भिडतें.

## जनता सहकारी बँक, सांगली

### मार्केटयार्ड, मिरज रोड, सांगली शाखा

वरील शाखेचें उद्घाटन रविवार, दि. २६ जानेवारी, १९६४ रोजीं आमदार श्री. वसंतराव ( दादा ) पाटील ह्यांच्या अध्यक्षतेखालीं नामदार राजाराम बापू पाटील ( उपमंत्री, महसूल व वन, महाराष्ट्र राज्य ) ह्यांच्या हस्तें मार्केट कमिटीच्या इमारतींत झालें.

## हंगेरीच्या मदतीनें कांचकारखाना

आंध्र राज्याच्या इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशनला कांचकारखाना काढण्याचा परवाना मिळाला आहे. कारखाना हंगेरीच्या मदतीनें स्थापन करण्यांत येणार असून त्यासाठीं ३ कोटी रुपये भांडवल लागेल. १९६६ च्या सुमारास कारखान्यांत प्रत्यक्ष उत्पादनाला प्रारंभ होईल. त्याचें रोजचें उत्पादन ८५ टन होईल. कारखान्यासाठीं लागणारी १·५ कोटी रुपयांची यंत्रसामग्री हंगेरीकडून आयात करण्यांत येणार आहे.

## कामगारांच्या क्लबांतील वर्ण विरोध

इंग्लंडमधील अक्रिंगटन येथील कामगारांच्या क्लबाचे सभासद होण्यास काळ्या वर्णाच्या लोकांना बंदी करणारा ठराव क्लबाच्या सभासदांनीं दोनतृतीयांश बहुमतानें मंजूर केला. गोरे आणि काळे ह्यांच्यांत सामाजिक संबंध ठेवण्यास काळे लोक अद्याप पात्र झालेले नाहींत, असे विचार क्लबाच्या अध्यक्षांनीं व्यक्त केले. भारताच्या एका नागरिकानें सभासद होण्यासाठीं अर्ज केला असतां हा प्रश्न अशा रीतीनें धसाला लागला.

## उत्पादन-क्षमतेचा पूर्ण उपयोग व्हावयास हवा

दिल्ली येथील इंडिआ इंटरनॅशनल सेंटर ह्या संघटनेपुढें बोलतांना नियोजन समितीचे उपाध्यक्ष श्री. अशोक मेहता ह्यांनीं भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासाविषयीं आपले विचार व्यक्त केले. ते म्हणाले कीं, आर्थिक विकासासाठीं दोन प्रकारांनीं त्याग करणें अपरिहार्य झालेलें आहे. निर्यातवाढ करण्यासाठीं लोकांनीं आपल्या आजच्या गरजांना मुरड घातली पाहिजे. त्यागाचा हा एक प्रकार झाला. रोज खपाच्या वस्तूंची मागणी कमी करून उत्पादन साधनें वाढविणाऱ्या उद्योगधंद्यांची वाढ करण्यासाठीं त्याग करणें हा दुसरा प्रकार. देशांतील सध्यांची उत्पादनक्षमता ज्या मानानें वापरांत आणली जाईल त्या मानानें लोकांना पोट आवळण्याची गरज कमी पडेल; मग ही उत्पादनक्षमता यांत्रिक असो अगर नसो. हिंदमधील हस्तव्यवसायांचा आणि परंपरागत कौशल्याचा वापर करण्यांत आल्यास रोजखपाच्या वस्तूंचा अधिक चांगला पुरवठा होईल आणि लोकांना रोजगारहि मिळेल. भारतामधील परिस्थिति अशी आहे कीं, येथें लोकसंख्येची वाढ आणि आर्थिक विकास विरोधी दिशांनीं वाटचाल करीत आहेत. त्याचा परिणाम असा होतो कीं, आर्थिक विकासाचा वेग ३ ते ३॥ टक्के झाला तरी लोकांच्या राहणीच्या मानावर त्याचा कांहीं अनुकूल परिणाम दिसून येत नाहीं. नवीन धरणें, नवीं वीजउत्पादककेंद्रें आणि वीजवाहक तारांचे मनोरे ठिकठिकाणीं दिसतात. पण, फलनिष्पत्तीच्या दृष्टीनें इतकेंच होतें कीं, बरेचसे लोक पहिल्याच राहणीच्या मानावर स्थिर राहतात. अर्थव्यवस्थेतील उत्पादनाच्या प्रक्रियांचा जोंपर्यंत पूर्ण विकास झालेला नाहीं तोंपर्यंत उत्पादनाचा वेग वाढविणें आणि तें अधिक कार्यक्षमतेनें करणें एवढा एकच उपाय ह्या परिस्थितीला तोंड देण्यास उपयोगी पडेल.

## मुंबईचे आकर्षण कमी झालें

मोठ्या शहरांतून रोजगार मिळण्याची शक्यता अधिक म्हणून मुंबईसारख्या शहरांत बाहेरून कामधंद्यासाठीं लोक नेहमींच येत असतात. लोकसंख्येच्या प्रश्नांचा अभ्यास करणारे डॉ. चंद्रशेखरन् ह्यांनीं ह्यासंबंधीं केलेल्या संशोधनावरून कामधंदा मिळविण्याबाबतचें मुंबईचें आकर्षण कमी झालेलें दिसून येत आहे. गेल्या दहा वर्षांत मुंबईत स्थायिक होण्याच्या इरायानें येणाऱ्या लोकांच्या संख्येंत ३ लाखांनीं घट झालेली आहे. १९५१ ते १९६१ ह्या दहा वर्षांच्या कालांत देशाच्या निरनिराळ्या भागांतून १३ लाख लोक मुंबईत स्थायिक होण्यासाठीं आले. त्यांपैकीं ६ लाख लोकांनीं शहराचा आसरा कायमचा पत्करला. १९४१ ते १९५१ ह्या कालांत ९ लाख लोकांनीं मुंबईत आपलें बिऱ्हाड थाटलें होतें. ह्याचा अर्थ असा कीं, मुंबईत आतां रोजगार मिळण्याची शक्यता कमी झालेली आहे. त्याशिवाय मुंबईतील जीवन राहण्याच्या जागेच्या टंचाईमुळें अतिशय कष्टाचें झालेलें आहे. तसें म्हटलें तर मुंबईच्या परिसरांतील उद्योगधंद्यांची वाढ झपाट्यानें होत आहे. परंतु ह्या वाढींत एक गोम आहे. नव्या उद्योगधंद्यांत आधुनिक तऱ्हेचीं यंत्रें बसविण्यांत येत असल्यानें कामगारांना रोजगार मिळण्याच्या संधि फारशा वाढत नाहींत. मुंबई शहरांतील कामगारवर्गापैकीं ४·६ टक्के कामगार बेकार आहेत. गेल्या १० वर्षांत मुंबईत बाहेरून आलेल्या लोकांपैकीं बहुतेक लोक महाराष्ट्राच्या निरनिराळ्या जिल्ह्यांतून आलेले होते. महाराष्ट्रांतून मुंबईत आलेल्यांची संख्या ४२ टक्के होती. सुमारें १७ टक्के लोक गुजरातमधून आलेले होते. उत्तर प्रदेशांतून १२ टक्के आवक झालेली होती आणि म्हैसूरमधून ६ टक्के लोक आलेले होते. ह्या लोकांपैकीं बहुतेक लोक मुंबईच्या वाढत्या उपनगरांत स्थायिक झाले.

## कॅनडांत खोट्या नोटांचा सुळसुळाट

कॅनेडिअन बँकर्स असोसिएशन ह्या संघटनेतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या बँकिंगविषयक नियतकालिकांत देण्यांत आलेल्या माहितीप्रमाणें कॅनडांत खोट्या चलनी नोटांचा सुळसुळाट झाला असून सरकारपुढें मोठा पेंच उत्पन्न झाला आहे. खोट्या नोटा तयार करणारांनीं हा धंदा फार मोठ्या प्रमाणावर चालविला आहे. कॅनडांतील मोठ्या बाजारांत गल्ल्यावर बसणाऱ्यांना खोट्या नोटांच्या नंबरांची एक लांबलचक यादीच जवळ ठेवावी लागते आणि गिऱ्हाइकाकडून येणाऱ्या नोटांची खातरजमा करावी लागते. कॅनडांतील क्विबेक आणि ऑंटेरिओ ह्या दोन मोठ्या शहरांतच फक्त खोट्या नोटा करणारे लोक १ कोटी ते ३ कोटी डॉलर्सच्या खोट्या नोटा वापरून लोकांना लुबाडत आहेत. ही फसवणूक सालोसाल चालू आहे. हिंदी चलनांत ह्या नोटांची किंमत ५ ते १५ कोटी रुपये होईल. केवळ खोट्या नोटा चालवूनच लोकांची फसवणूक होत आहे, असें नाहीं; त्याशिवाय खोटे चेक्स, बनावट पोस्टल मनिऑर्डरी इत्यादि मार्गांनींहि लोकांना बनविण्यांत येतें. बनावट कागदपत्रांबद्दल करण्यांत येणारे हे गुन्हे छापण्याच्या तंत्रांत झालेल्या आधुनिक सुधारणांमुळें अधिक प्रमाणांत शक्य झाले आहेत. पण त्याचबरोबर लोकांची अनास्थाहि कांहीं प्रमाणांत जबाबदार आहे. कांहीं जबाबदारी छपाईच्या धंद्यावरहि जरूर पडते. बनावट नोटा अगर रोखे अगर इतर कागदपत्र आतां एखाद्या छुप्या पोटमाळ्यावर करतां येत नाहींत. त्यासाठीं आधुनिक धर्तीच्या छपाईच्या तंत्राचा आसरा घ्यावा लागतो. पुष्कळदा एरव्हीं कायदेशीर धंदा करणारे लोकच नकळत बनावट कागदपत्रांच्या धंद्याला मदत करीत असतात, किंवा चांगल्या शहाजोग कंपन्यांतून कामें करणारे लोक नकळत ह्या धंद्याला लागणारीं साधनें, कच्चा माल आणि सोयी पुरवत असतात. त्यामुळें छपाईच्या धंद्याच्या सहकार्याशिवाय बनावट कागदपत्रांच्या व्यवसायाचें निर्मूलन होणें कठीण आहे.

## साखरेचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न

साखरेच्या धंद्याबाबत स्थापन करण्यांत आलेल्या विकास मंडळानें साखरेचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न चालविले आहेत. विकास मंडळाची स्थापना १९५४ सालीं झाली. तेव्हांपासून साखरेच्या धंद्यासंबंधींच्या प्रश्नांची चर्चा मंडळांत करण्यांत येत आहे. देशांत साखर, गूळ आणि खांडसारी हे तीन गोड पदार्थ लोकांना कमी-अधिक प्रमाणांत लागत असतात. चवथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस भारताची ह्या पदार्थांची गरज ४५ लाख टनांपर्यंत जाईल, असा अंदाज करण्यांत आला आहे. तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस होणारें उत्पादन लक्षांत घेतां, आणखी ८ लाख टन गोड पदार्थ निर्माण करण्याची गरज असून त्यासाठीं आणखी साखरेच्या कारखान्यांना परवाने देण्यांत येत आहेत. साखरेच्या धंद्याची उत्पादनक्षमता क्रमाक्रमानें वाढत आहे. पहिल्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या आरंभापासून दरसाल १६·१४ लाख टन साखर निर्माण करण्याइतक्या कारखान्यांना परवाने देण्यांत आले. सध्यां ३३·६ लाख टन साखर निर्माण करण्यासाठीं परवाने देण्यांत आलेले आहेत· ह्या कालांत ७२ नव्या कारखान्यांना परवानगी देण्यांत आली, आणि १२० चालू कारखान्यांना विस्तार करण्याची परवानगी देण्यांत आली. परवाने मिळालेल्यांपैकीं ४९ कारखान्यांत उत्पादन चालू झालें आणि तितक्याच कारखान्यांनीं आपल्या विस्ताराच्या योजना तयार केल्या आहेत. त्या पूर्ण झाल्या म्हणजे साखरेच्या उत्पादनांत दरसाल १० लाख टनांची भर पडणार आहे. १९६३ चा नवा हंगाम गेल्या नोव्हेंबरमध्यें सुरू झाला. तेव्हांपासून ३ नवे कारखाने चालू झाले असून आणखी ४ कारखाने उत्पादनास प्रारंभ करण्याच्या तयारींत आहेत. त्याशिवाय कांहीं कारखान्यांनीं आपला विस्ताराचा कार्यक्रम पुरा करीत आणला आहे.

## आंध्र राज्यांत सुताच्या गिरण्या

आंध्र प्रदेशांत खाजगी मालकीच्या विभागांत सुताच्या १८ गिरण्या काढण्याचे परवाने भारत सरकारनें दिले आहेत. त्यांपैकी १२ गिरण्या कमी-अधिक प्रमाणांत उभारण्यांतहि आल्या आहेत अगर येत आहेत. दोन तर पुढच्याच महिन्यांत उत्पादन करूं लागतील. प्रत्येक गिरणींत किमान १२ हजार चात्या असतील. त्याशिवाय सहकारी मालकीच्या विभागांत आणखी ६ गिरण्या उभारण्यांत येणार आहेत. आंध्र सरकारच्या इंडस्ट्रिअल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशननें आपल्या स्वतःच्या जबाबदारीवर तीन कारखाने काढण्याचें ठरविलें आहे. त्यांपैकी दोन कारखाने हैदराबाद शहरानजीक आणि तिसरा वरंगळजवळ उभारण्यांत येईल. हैदराबादजवळील कारखान्यांपैकी एक कांचेचा आहे.

## मद्रासजवळील तेलशुद्धीचा कारखाना

मद्रासजवळ स्थापन करण्यांत येणाऱ्या तेलशुद्धीच्या कारखान्याबाबत भारत सरकारचें पेट्रोल व केमिकल्स खातें इराण व कुवाइतच्या प्रतिनिधींशीं विचारविनिमय करीत आहे. हा कारखाना स्थापन करण्यासंबंधीं १७ कंपन्यांकडून सहकार्य करण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. त्यांत अमेरिका, ब्रिटन, फ्रान्स, इटाली आणि जपान ह्या देशांतील कंपन्याहि आहेत. कुवाइतमधील तेल कंपनीनें निर्देश केलेल्या तेलाच्या किमती राशिआच्या तेलापेक्षाहि कमी आहेत. भारताला तेल विकून मिळणाऱ्या परदेशी चलनांतील कांहीं हिस्सा भारतांतच ठेवून तो तेलशुद्धीच्या कारखान्यासाठी वापरण्याची तयारी कुवाइत सरकारनें दाखविली आहे. तेलापासून तयार होणारे इतरहि कांहीं पदार्थ भारताला पुरविण्याची तयारी दाखविण्यांत आली आहे. १९६६ पासून हे पदार्थ पुरविण्यांत येण्याची शक्यता आहे.

## केळयांच्या निर्यातीसाठी कॉर्पोरेशन

दक्षिण भारतामधील मद्रास, आंध्र, म्हैसूर आणि केरळ राज्यांनीं केळयांच्या निर्यातीसाठी एक कॉर्पोरेशन काढण्याचें ठरविलें आहे. सार्वजनिक मालकीच्या ह्या व्यापारी संस्थेचें वसूल भांडवल १० लाख रुपयांचें असेल. ह्या भांडवलापैकी प्रत्येकी अडीच लाख रुपयांचें भांडवल संबंधित राज्यें उभारणार आहेत. कॉर्पोरेशनची मुख्य कचेरी मद्रास येथें राहील. केळयांचा पुरवठा, त्यांची वाहतूक, सांठा आणि निर्यात ह्या संबधींचीं सर्व कामें कॉर्पोरेशन करील. केळयांची परदेशीय निर्यात मोठ्या प्रमाणावर यशस्वी झाल्यास भारताला परदेशीय चलनाच्या प्राप्तीचें एक नवें साधन उपलब्ध होणार आहे. परदेशी निर्यात करण्यांत येणारीं केळीं खाण्यासारख्या अवस्थेंत टिकवून योग्य ठिकाणीं कशीं पोंचवावीं हाच खरा प्रश्न आहे. इटालीला धाडण्यांत आलेल्या कांहीं केळयांपैकी ४० टके केळीं वाटेंत खराब झाल्याचें आढळून आलेलें आहे.

## चहाच्या निर्यातीला धोका

भारत सरकार चहाची निर्यात वाढवून अधिकाधिक परदेशीय चलन मिळण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु चहाच्या निर्यातीला इतर देशांच्या स्पर्धेबरोबर आणखी एक धोका उत्पन्न झाला आहे. साखरमिश्रित तयार कॉफीसारखा चहा करण्यासाठी संशोधन चालू आहे. तें यशस्वी झाल्यास ह्या नव्या चहाची गिऱ्हाइकी वाढेल आणि त्या प्रमाणांत सध्याच्या स्वरूपांतील चहाची मागणी कमी होईल. तयार कॉफीबाबत असा अनुभव आलेला आहे. गिऱ्हाइकांच्या मागणींत असा बदल होण्यास अर्थात् वेळ लागेल.


दि सरदार
कारबोनिक गॅस कंपनी लि.
उत्पादक
कारबोनिक ॲसिड गॅस
सुका बर्फ, सोडा वॉटर मशिनरी
आणि
खनिज पाण्याच्या आवश्यकतेसंबंधीं विक्रेते
रजिस्टर्ड हेड ऑफिस आणि एजन्ट्सचें ऑफिस
सर विठ्ठलदास चेंबर्स, १६ अपोलो स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.
फॅक्टरी ऑफिस : कॅनॉट रोड, माझगांव, मुंबई. टे. नं. ४०८१२
शाखा आणि फॅक्टरी
१ केडल रोड, दादर, फिझाइट फॅक्टरी टे. ६११२९
२ काम्पटी फॅक्टरी एरिया, रेल्वे स्टेशनच्या दक्षिणेस, काम्पटी ( कँट ) टे. १०८
३ दिल्ली–रामबाग रोड, बंगेश पूल टे. २२४७०२
४ कलकत्ता–२०३ ए फोरशोर रोड, शिवपूर, हावरा. टे. ६७–२२४७
५ विजयवाडा–गुणदला, कृष्णाजी स्ट्रीट, आंध्र प्रदेश टे. २०४१
६ रावळपिंडी–डलहौसी रोड.
सर्व शाखांसाठी आणि फॅक्टऱ्यांसाठी टेलिग्राफिक पत्ता : 'कारबोनिक'

### जमेकाकडे प्रवाशांना खेचणारी सुंदरी

लहान देशांचेजवळ लष्करी सामर्थ्य किंवा आर्थिक बळ नसलें तरी ते आपला प्रभाव पाडण्यासाठी युक्त्या योजीत असतात. जमेकाचीच गोष्ट घ्या ना. त्या छोट्या बेटाचें क्षेत्रफळ ४,००० चौरस मैल असून त्याची लोकसंख्या अवघी १५ लक्ष आहे. तरी सुद्धां त्यानें जागतिक सुंदरी स्पर्धेतील आपल्या पहिल्या अनुक्रमाच्या कॅरोल क्रॉफर्ड ह्या तरुणीच्या लोकप्रियतेचा व्यापारी फायदा उठवण्यांत यश मिळविलें आहे. ती सुंदरी जमेकाची प्रतिमा बनवून टाकण्यांत आली आहे. पाटर्या, सत्कार, मुलाखती, इत्यादि कार्यक्रम लंडनमध्यें उरकून तिला जर्मनी आणि फ्रान्समध्यें फिरवून आणण्यांत आलें. "जमेकाला मजा करायला या" हा तिच्या यात्रेचा संदेश होता. जमेकाच्या निर्गत व्यापाराच्या प्रचारमोहिमेसाठी तिचा उपयोग करण्यांत येत आहे; लवकरच ती लॅटिन अमेरिकेच्या दौऱ्यावर जाणार आहे. ह्या जागतिक सुंदरीच्या पदाची मुदत एक वर्षाची आहे. गेल्या कांहीं वर्षांत जमेकाच्या मंत्र्यांनीं परदेशांचे दौरे करून फारसें मिळवलें तर नाहींच; कर देणाचा नागरिकांचे खिसे मात्र त्यामुळें रिते झाले. कॅरोल क्रॉफर्ड एका वर्षाच्या अवधींतच जमेकाची आकर्षक जाहिरात करून परदेशी प्रवासी आणि त्यांच्या पैशाचा ओघ जमेकाकडे वळवूं शकेल. तिच्या प्रतिमेचें पोस्टाचें एक तिकिटहि लवकरच तेथील सरकार काढणार आहे. त्या तिकिटामुळें वेगवेगळया देशांतील तिकिटांचे छांदिक पैसे खर्च करून जमेकाची उत्कृष्ट आठवण बाळगतील.

### लोकसंख्येची शहरांकडे धाव

भारतांतील लोक खेडेगांवांतून शहरांकडे स्थलांतर करीत आहेत, त्यामुळें एकूण लोकसंख्येमधील शहरी लोकांचें प्रमाण वाढत असून खेडेगांवांतील वस्ती कमी होत आहे:—

खेडेगांवांतील व शहरांतील लोकसंख्या १९२१–६१

एकूण लोकसंख्येशीं प्रमाण %

| वर्ष | खेडेगांवांत | शहरांत |
|---|---|---|
| १९२१ | ८८·६ | ११·४ |
| १९३१ | ८७·९ | १२·१ |
| १९४१ | ८६·१ | १३·९ |
| १९५१ | ८२·७ | १७·३ |
| १९६१ | ८२·२ | १७·८ |

शहरांची संख्याहि वाढत चालली आहे :—

( i = १,००,००० वस्तीवरचीं गांवें; ii = ५०,००० ते ९९,९९९ वस्तीचीं गांवें; iii = २०,००० ते ४९,९९९ वस्तीचीं गांवें; iv = १०,००० ते १९,९९९ वस्तीचीं गांवें; v = ५,००० ते ९,९९९ वस्तीचीं गांवें; vi = ५,००० पेक्षा कमी वस्तीचीं गांवें. )

( लोकसंख्या : आकडे लक्षांचे )

| वर्ष | i संख्या | लोकसंख्या | ii संख्या | लोकसंख्या | iii संख्या | लोकसंख्या | iv संख्या | लोकसंख्या | v संख्या | लोकसंख्या | vi संख्या | लोकसंख्या | एकूण संख्या | एकूण लोकसंख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९०१ | २७ | ६ | ४५ | ३ | १४८ | ४ | ४२२ | ६ | ७६८ | ५ | ५०० | २ | १,९१० | २६ |
| १९११ | २५ | ६ | ३८ | ३ | १५७ | ५ | ३९० | ५ | ७५६ | ५ | ५४७ | २ | १,९१३ | २६ |
| १९२१ | २८ | ७ | ४९ | ३ | १७२ | ५ | ३९८ | ५ | ७८० | ६ | ६०३ | २ | २,०५० | २८ |
| १९३१ | ३२ | ८ | ५६ | ४ | २२४ | ७ | ४८४ | ७ | ८५६ | ६ | ६०९ | २ | २,२६१ | ३४ |
| १९४१ | ४९ | १४ | ८७ | ६ | २७२ | ८ | ५५३ | ८ | ९८८ | ७ | ४७८ | २ | २,४२७ | ४५ |
| १९५१ | ७४ | २४ | १११ | ८ | ३७५ | ११ | ६७० | ९ | १,१८९ | ८ | ६३८ | २ | ३,०२७ | ६२ |
| १९६१ | १०७ | ३५ | १४१ | १० | ५१५ | १६ | ८१७ | ११ | ८४४ | ६ | २६६ | १ | २,६९० | ७९ |

### सार्वजनिक सुट्ट्यांचे तुलनात्मक आकडे

सरकारी कचेऱ्या, बँका, कारखाने, मळे, खाणी, इत्यादींना भारतांत जितक्या सुट्या असतात, तितक्या बहुतेक इतर देशांत नसतात. इंग्रज सरकारला येथील लोकांच्या धार्मिक व सामाजिक भावनांना दुखवायचे नव्हते, त्यामुळें त्यानें सुट्ट्यांचे बाबतींत सैल धोरण ठेवलें होतें. राज्यकर्त्यांनाहि येथील हवामानांत जास्त सुट्या मिळाल्या, तर हव्याच होत्या. हें सर्व आतां पालटूं लागलें आहे. भारतांतील व्यापारी फर्म्स सध्यां वर्षांतून सरासरीनें २८० दिवस काम करते. कित्येक फर्म्सचे वरिष्ठ अधिकारी आतां आठवड्यांतून दोन दिवस सुट्टी घेऊं लागले आहेत.

#### कांहीं निवडक देशांतील सुट्ट्या

| देश | सार्वजनिक सुट्ट्या |
|---|---|
| जर्मनी | २१–३१ |
| बेल्जम | २२ |
| फ्रान्स | २४ |
| इटली | १६–३२ |
| लक्झेंबर्ग | १८ |
| हॉलंड | १८–३२ |
| ग्रटब्रिटन | १७ |

भारतांत १९६३ मध्यें राज्यनिहाय सार्वजनिक सुट्या खालीलप्रमाणें होत्या :—

आंध्र २०, आसाम १९, प. बंगाल २३, बिहार ३१, मध्यवर्ती सरकार १७, दिल्ली १९, केरळ २०, महाराष्ट्र २८, मध्यप्रदेश २१, मद्रास १८, म्हैसूर २०, ओरिसा १७, पंजाब १७, राजस्तान २३ आणि उत्तर प्रदेश २०.

### काथ्याच्या तरटांचा कारखाना

दक्षिण रत्नागिरीमध्यें सावंतवाडी अगर वेंगुर्ला ह्या ठिकाणी काथ्यापासून बनविण्यांत येणाऱ्या तरटांचा एक यांत्रिक कारखाना काढण्यांत येणार आहे. महाराष्ट्र राज्यांत अशा प्रकारचा हा पहिलाच कारखाना होईल आणि तो जिल्हा परिषदेतर्फे चालविण्यांत येईल. कारखान्यासाठी ३५ हजार रुपयांची यंत्रसामग्री मागविण्यांत आली आहे. भारतांत काथ्यापासून तरटे करणारे असेच कारखाने आंध्र व केरळ राज्यांत आहेत. सिलोनमध्येंहि कांहीं कारखाने आहेत.

### बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर भारतांत येणार

दि बँक ऑफ इंग्लंडचे गव्हर्नर, लॉर्ड क्रोमर हे रिझर्व्ह बँकेचे पाहुणे म्हणून भारतांत १५ दिवसांच्या मुक्कामासाठी ५ फेब्रुवारी रोजीं लाहोरहून दिल्लीला येतील. दिल्ली, आग्रा, जयपूर आणि मुंबई ह्या ठिकाणांना ते भेट देतील. ते सपत्नीक येणार आहेत.

## जगांतील सर्वांत मोठ्या बँकेचे भारतांतील प्रतिनिधी

### वीर के. सोंधी ह्यांची नेमणूक

मुंबई येथें लवकरच सुरू होणाऱ्या, 'बँक ऑफ अमेरिका' च्या शाखेचे मॅनेजर म्हणून वीर के. सोंधी ह्यांची नेमणूक झाली आहे. श्री. सोंधी ह्यांचा जन्म ३४ वर्षांपूर्वी जालंदर येथें झाला. लहानपणींच ते शिक्षणासाठी अमेरिकेला गेले. कांहीं वर्षें ते केंब्रिज विद्यापीठांत शिकून परत अमेरिकेला गेले आणि तेथें त्यांनीं १९५३ सालीं कॅलिफोर्निया विद्यापीठाची 'इंटरनॅशनल फायनॅन्स' विषयाची एम्. ए. पदवी मिळविली. मुंबईच्या शाखेंत नेमणूक होण्यापूर्वी ते बँक ऑफ अमेरिकाच्या सॅनफ्रॉन्सिस्को शाखेंत काम करीत होते; मध्यपूर्व आणि आफ्रिका येथें बँकेनें दिलेल्या कर्जांच्या देखरेखीचें खातें त्यांच्याकडे होतें. ह्या बँकेची जिंदगी सुमारें ७,५०० कोटी रु. असून ती अमेरिकेंतीलच नव्हे, तर सबंद जगांतील मोठी बँक आहे. १९०४ सालीं तिची कॅलिफोर्नियांत स्थापना झाली. तिच्या दक्षिण अमेरिका, युरोप, मध्यपूर्व, आशिया आणि आफ्रिका ह्यांत एकूण २२ शाखा आहेत. "माझ्या जन्मभूमींत, मी जिचें नागरिकत्व पत्करलें आहे अशा देशाचें प्रतिनिधित्व करण्यांत मला आनंद वाटत आहे. मला त्यामुळें दोन्ही दृष्टिकोणांतून पाहाता येईल; दोघांचेंहि हित साधतां येईल" असें श्री. सोंधी म्हणाले. सध्यां ते दिल्ली येथें आहेत.

---

### चित्रमयजगत् सीमासंघर्ष विशेषांक

चित्रमयजगत् मासिकाचा जानेवारी, १९६४ चा अंक सीमासंघर्ष विशेषांक म्हणून प्रसिद्ध करण्यांत आला आहे. पाकिस्तान-भारत सीमेवरील संघर्ष ही फार मोठी चिंतनीय बाब नव्हती, परंतु पाकिस्तान–चीन हातमिळवणीचा धोका आतां उग्रतर होत चालला असून सीमांच्या संरक्षणाचा प्रश्न केव्हां गंभीर स्वरूप धारण करील ह्याचा नेम नाहीं. ह्या दृष्टीनें ह्या संभाव्य संकटाचें स्वरूप जनतेला माहीत असणें अगत्याचें आहे. प्रस्तुत विशेषांकांत श्री. मामासाहेब देवगिरीकर, श्री. पां. वा. गाडगीळ, डॉ. शेजवलकर, डॉ. केरूर, इत्यादि लेखकांनीं ह्या विषयावर माहितीपूर्ण लेख लिहिले आहेत. सीमासंघर्षाच्या आर्थिक आणि राजकीय बाजूंचाच त्यांत मुख्यत: विचार केलेला आढळतो; लष्करी बाजूचा विचारहि होणें आवश्यक आहे. परंतु तो प्रश्न फारच मोठा म्हणून स्वतंत्र चर्चेचा आहे. (संपादक : रा. प्र. कानिटकर).

---

### चोरीच्या प्रयत्नांत बँकेला नफा

लंडनच्या उपनगरांतील एका बँकेच्या कचेरींत दोन इसम चोरी करण्याच्या उद्देशानें आले. त्यांनीं कौंटरवरील कारकुनाकडे एकेक पौंडाच्या ५० नोटा दिल्या आणि त्याऐवजीं नोटा मागितल्या. कारकून नोटा मोजत असतांना त्यांनीं त्याच्याजवळील नोटा हिसकावून घेतल्या आणि पोबारा केला. पण त्या सातच नोटा होत्या ! एक पौंडाच्या ५० नोटा कौंटरवर तशाच राहिल्यानें बँकेला फायदाच झाला.

---

**साखरेच्या कारखान्यांची यंत्रसामग्री**—साखरेच्या कारखान्यासाठी लागणाऱ्या यंत्रसामग्रीचे नमुने निश्चित करण्यासाठी भारत सरकारनें १२ तंत्रज्ञांची एक कमिटी नेमली आहे. दररोज १,००० पासून २,००० टन ऊंस गाळणारी यंत्रसामग्री तयार करण्याच्या तांत्रिक बाजूचा कमिटी अभ्यास करीत. कमिटीनें आपला अहवाल ६ महिन्यांत सादर करावयाचा आहे.


दूरध्वनि : २२४८३. तार : सेंको बँक

# पुणें सेंट्रल

## को-ऑपरेटिव्ह बँक, लिमिटेड, पुणें

लक्ष्मी पथ–पुणें शहर.

**व्याजाचे नवीन आकर्षक दर–**

| | | | |
|---|---|---|---|
| चालू ठेव | ... | ... | १/४ टक्के |
| सेव्हिंग्ज | ... | ... | ३ टक्के |

**कायम ठेव–**

| | | | |
|---|---|---|---|
| १ महिना | ... | ... | २·३७ टक्के |
| ३ महिने | ... | ... | ३·५० टक्के |
| ६ महिने | ... | ... | ३·७५ टक्के |
| १ वर्ष | ... | ... | ४ टक्के |
| २ वर्षें | ... | ... | ४·२५ टक्के |
| ३ वर्षांचे वर | ... | ... | ४·५० टक्के |

**याशिवाय भक्कम सुरक्षित ठेवघरें.**

*आमच्या बँकेच्या कोणत्याहि शाखेस भेट द्या.*
*सर्व माहिती आनंदानें पुरवूं.*

डी. बी. तांबट
कार्यकारी संचालक.



# दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा

शेड्यूल्ड बँक

**हेड ऑफिस : चिरमुले निकेतन, सातारा शहर.**

टेलिफोन नं. ६४ ] स्थापना १९३६ [ तारेचा पत्ता:–युवर बँक

—: वाढविलेले नवीन व्याजाचे दर :—

सेव्हिंग्ज् बँक:–३ टक्के

मुदत ठेवी

१ वर्ष–४¼ टक्के, २ वर्षें–४½ टक्के, ३ वर्षें–४¾ टक्के,
४ वर्षें–५ टक्के, ५ वर्षें–५¼ टक्के.

एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात. तसेंच, कंपलसरी सेव्हिंग्ज व क्युम्युलेटिव्ह ठेवींचे योजनेचा गिऱ्हाइकांनीं अवश्य फायदा घ्यावा.

**शाखा–विस्तार**

शाखा–१. मुंबई–फोर्ट, २. मुंबई–गिरगांव, ३ मुंबई–दादर, ४. मुंबई-डोंबिवली, ५. नाशिक, ६. पुणें, ७. बार्शी, ८. लोणंद, ९. कोल्हापूर, १०. कोल्हापूर–मार्केट यार्ड, ११. हलकर्णी, १२. इचलकरंजी, १३. फलटण, १४. अकलूज, १५. कराड, १६. कोरेगांव, १७. मसूर, १८. उंब्रज, १९. ओगलेवाडी, २०. करमाळा, २१. सातारा रोड. दि. ३१–१२–१९६३

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ११,९३,२५० |
| गंगाजळी | रु. | ६,५०,००० |
| ठेवी | रु. | ४,००,००,०००हून अधिक |
| खेळतें भांडवल | रु. | ४,५०,००,०००हून अधिक |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

रा. ह. जोशी, बी.ए., बी. कॉम्., जनरल मॅनेजर.

रा. ना. गोडबोले, बी. ए., बी. कॉम., सी. ए. आय. आय. बी. चेअरमन.

## मेहता कमिशनच्या शिफारसी

### सहकारी शासनयंत्रणा सुधारण्यासाठी सूचना

सन १९६३ च्या फेब्रुवारीमध्यें दिल्ली येथें राज्यांच्या सहकार मंत्र्यांची परिषद भरली होती. त्या परिषदेच्या निर्णयानुसार सहकारी शासनयंत्रणा मजबूत करण्यासाठी कोणती उपाययोजना केली पाहिजे याचा विचार करून सरकारला सल्ला देण्यासाठी श्री. वैकुंठराय मेहता यांच्या अध्यक्षतेखाली एक समिति एप्रिल १९६३ मध्यें नेमण्यांत आली होती. शासनयंत्रणा मजबूत करण्यासाठी समितीनें खालीलप्रमाणें उपाययोजना सुचविणाऱ्या शिफारशी केल्या आहेत :—

#### खात्यांतील नोकरांची वाढ

गेल्या कांहीं वर्षांपर्यंत सहकारी चळवळीचा संबंध प्रामुख्यानें कर्ज वाटपाशींच होता. परंतु आज विविध क्षेत्रांत सहकारी चळवळीचा प्रसार झाल्यामुळें त्या त्या क्षेत्रांतील आर्थिक उलाढाली सहकारी चळवळीनें हातीं घेतल्या आहेत. याचाच अर्थ असा कीं शासनाचें काम गुंतागुंतीचें व अवघड झालें आहे. या संदर्भात समितीनें राज्यांतील नोकरांची वाढ करण्याची शिफारस केली आहे आणि त्याचबरोबर समितीनें हाहि इशारा दिला आहे कीं, खात्यांतील नोकरवाढीमुळें सहकारी संस्थांच्या दररोजच्या कामामध्यें मात्र हस्तक्षेप होऊ नये व त्यांच्या स्वातंत्र्यावर व स्वायत्ततेवर घाला घातला जाऊ नये.

#### सहकारी संस्थांची देखरेख

सहकारी संस्थांच्या देखरेखीबद्दल समितीनें असें म्हटलें आहे कीं, प्राथमिक पतपेढ्या व्यतिरिक्त इतर सहकारी संस्थांची देखरेख महामंडळाच्या एखाद्या शाखेकडे सोंपवावी. जोंपर्यंत सहकारी क्षेत्रांत ठराविक पद्धतीचा अवलंब केला जात नाहीं, तोंपर्यंत तद्विषयक जबाबदारी सहकार खात्याचीच आहे.

#### राजकारणाला थारा नको

सहकारी संस्था ह्या प्रामुख्यानें व्यापारी संस्था असल्यानें त्यांच्या कामकाजांत राजकीय किंवा इतर गोष्टींना प्राधान्य मिळूं नये, यावर समितीनें भर दिला आहे. ह्या संदर्भात पंचायती राज्य संस्थांकडे ह्या संस्था जर गेल्या तर त्यामुळें सहकार खातें तेजोहीन होईल आणि त्याचा परिणाम सहकारी संस्था महामंडळाकडे देऊन त्यांच्यांत स्वयंभू शिस्त व नियमबद्धता आणण्याचा जो प्रयत्न आहे त्यामध्यें अडथळे निर्माण होतील असें मत समितीनें व्यक्त केलें आहे.

#### हिशोब तपासणीसाठी खास विभाग

सहकारी हिशोबतपासणीसाठी समितीनें सहकार खात्यामध्येंच एक स्वतंत्र हिशोब तपासणी विभाग उघडण्याची शिफारस केली आहे. या विभागाचा प्रमुख चीफ ऑडिटर असावा व त्याचा दर्जा जॉईंट रजिस्ट्रारचा असावा. यामुळें हिशोबतपासणीच्या कामांत ढवळाढवळ होणार नाहीं असें समितीला वाटतें.

#### सहकार खातें

सहकार खातें अधिक मजबूत करण्याच्या दृष्टीनें समितीनें रजिस्ट्रार हा सहकार खात्याचा प्रमुख असावा व त्याचा दर्जा इतर विकास खात्यांच्या प्रमुखासारखाच असावा व ज्या राज्यांमध्यें सहकारी चळवळ चांगल्या मजबूत पायावर उभी आहे व जेथें सहकारी चळवळीनें निरनिराळ्या आर्थिक क्षेत्रांत पदार्पण केलें आहे, तेथें रजिस्ट्रारला कमिशनरचा दर्जा असावा अशा शिफारशी केल्या आहेत.

रजिस्ट्रारला सहकारी खरेदी-विक्री व प्रक्रिया, औद्योगिक सहकारी संस्था हिशोब तपासणी, बँकिंग व क्रेडिट, आदि विषयांमध्यें सल्ला देण्यासाठी मुख्य ठाण्यावर सहा कार्यकारी सल्लागार असावेत. त्याशिवाय सहकारी शेती व ग्राहक सहकारी भांडारें यासाठी एक जॉईंट रजिस्ट्रार असावा.

महसूल खात्याची विभागीय कचेरी असेल त्या ठिकाणीं सहकार खात्यानेंहि विभागीय कचेरी उघडावी. दोन्ही विभागांचें व्याप्तीक्षेत्र एकच असेल.

जिल्हा पातळीवर संबंध जिल्ह्यासाठी सहकार खात्याचा एक अधिकारी असावा. त्याशिवाय प्रत्येक सर्कलला एक अधिकारी असावा आणि त्याला मदत करण्यासाठी दोन इन्स्पेक्टर असावेत.

#### रजिस्ट्रार आय. ए. एस्. मधील असावा

समितीनें रजिस्ट्रारची जागा आय. ए. एस्. मध्यें समाविष्ट करावी यासंबंधीं अनुकूल मत दिलें आहे. मात्र असें करतांना रजिस्ट्रारच्या जागेवर नेमणूक करावयाचा अधिकारी १२ वर्षे आय. ए. एस्. मध्यें सेवा केलेला व दोन वर्षे सहकार खात्यांत काम केलेला असावा.

समितीनें ऑल इंडिया ॲग्रिकल्चरल सर्व्हिस स्थापन झाल्यानंतर ऑल इंडिया को-ऑपरेटिव्ह सर्व्हिसच्या स्थापनेसंबंधीं निर्णय घेण्यांत यावा असें मत प्रतिपादिलें आहे.

याशिवाय समितीनें खात्यांतील यंत्रणेची विभागणी, खात्याचा सेवकवर्ग दुसऱ्या खात्याकडे कामगिरीवर पाठविणें, सेवकांची भरती व प्रशिक्षण, आदि संबंधींहि शिफारशी केल्या आहेत.

#### निर्गतींत वाढ, आयातींत घट

१९६३ मध्यें निर्गतीमुळें सुमारें १०० कोटी रु. जादा मिळालें आणि आयातीवरील खर्च सुमारें ४० कोटी रुपयांनीं कमी झाला. त्यामुळें परराष्ट्रीय हुंडणावळीच्या परिस्थितीची तंगी कमी भासली ह्यामुळें १९६४–६५ च्या अंदाजपत्रका विषयीं बऱ्याच अपेक्षा निर्माण झाल्या आहेत.


“ कुटुंब नियोजन कां व कसें ”

( फक्त विवाहितांसाठी )

विनामूल्य पुस्तिकेसाठी आपलें नांव व पत्ता खालील पत्त्यावर कळविणें.

कुटुंब नियोजन अधिकारी,
महाराष्ट्र राज्य,
कॅनॉट हाउस, पुणें १

दातांच्या स्वच्छतेसाठी

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

### साखरेच्या उत्पादनांत घट होण्याची शक्यता

इंडिअन शुगर मिल्स असोसिएशनच्या अध्यक्षांनीं चालू हंगामांत होणाऱ्या साखरेच्या उत्पादनाविषयीं निराशेचे उद्‌गार काढले आहेत. हंगामांत साखरेच्या उत्पादनाचें उद्दिष्ट ३३ लाख टनांचें ठरविण्यांत आलेलें आहे. परंतु सरकारनें ठरविलेल्या ह्या उद्दिष्टापेक्षा ७ लाख, ७० हजार टन उत्पादन कमी होईल असा अंदाज त्यांनीं व्यक्त केला आहे. म्हणजे, गेल्या हंगामाच्या उत्पादनापेक्षाहि चालू हंगामाचें उत्पादन २ लाख, ७० हजार टनांनीं कमी पडण्याचा संभव दिसत आहे. असोसिएशनचे अध्यक्ष श्री. जी. एम्. मोदी म्हणाले कीं, साखरकारखान्यांना उसाचा पुरेसा पुरवठा होण्यासाठी सरकारनें कांहीं उपायांची योजना केली आहे. परंतु त्यांचा इष्ट परिणाम झालेला नाहीं. हंगामाच्या प्रारंभीं सरकारनें उसाची किंमत दर मणामागें २ रुपये ठरवून दिली होती. परंतु गूळ उत्पादन करणारे व खांडसारी साखरनिर्माण करणारे ह्या दरापेक्षा अधिक दरानें ऊंस खरेदी करण्यास समर्थ आहेत. त्यामुळें उसाच्या पुरवठ्याचा ओघ साखर कारखान्यांकडे वळविण्याचा सरकारचा उद्देश साध्य होणार नाहीं. सध्यां साखर कारखान्यांना नियंत्रित दरानें साखर विकावी लागते. साखर कारखान्यांनीं गेल्या वर्षी उत्पादन केलेल्या साखरेपेक्षा जर अधिक साखर ह्या हंगामांत उत्पादन केली तर ही जादा साखर त्यांना खुल्या बाजारपेठेंत विकण्याची मोकळीक देण्यांत यावी. ही मोकळीक देण्यांत आली तर साखर कारखाने उसाला अधिक किंमत देऊन गाळिताचा हंगाम एकसारखा चालू ठेवू शकतील. अर्थात्, ह्या धोरणामुळें साखर कारखान्यांना व्यापारी धोका पत्करावा लागेल. पण असा धोका पत्करणें हा धंद्याचा एक नेहमींचाच भाग असतो. साखरेचा धंदा हा सरकारच्या नियंत्रणाखालीं असल्यामुळें उसाच्या दरांत कारखान्यांनीं आपण होऊन वाढ करावी, ही सूचना साखर कारखान्यांना परवडण्यासारखी नाहीं.


### ला. इं. कॉर्पोरेशनच्या अनिष्ट धोरणावर हायकोर्टाचे ताशेरे

"लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशन जेव्हां क्लेम्स नाकारते आणि तंटा न्यायालयाकडे जातो, तेव्हां कॉर्पोरेशननें सामान्य अशिलाप्रमाणें वागूं नये; वरच्या दर्जाची वागणूक ठेवावी म्हणजे जनतेमध्यें कॉर्पोरेशनविषयीं विश्वास निर्माण होईल; कांहींतरी निमित्त सांगून क्लेम्स नाकारले जात नाहींत ह्याबद्दल लोकांना खात्री पटेल" असे उद्‌गार मद्रास हायकोर्टाच्या डिव्हिजन बेंचनें एका अपिलाच्या निकालांत काढले आहेत. विमा घेतेवेळीं विमेदारानें मुद्दामच खोटीं विधानें केलीं होतीं, असें सांगून कॉर्पोरेशननें नॉमिनीला पैसे देण्याचें नाकारलें होतें, तर कॉर्पोरेशननें चार डॉक्टरांकरवीं तपासणी करवून नेहमींच्या दरानें विमा पत्करला होता असें नॉमिनीचें म्हणणें होतें. इन्शुअरन्स कायद्याच्या ४५ व्या कलमाप्रमाणें कॉर्पोरेशननें जबाबदारी पार पाडली नाहीं. विम्याची रक्कम ५०,००० रु. होती आणि विमेदार विमा घेतल्यानंतर एका वर्षातच मरण पावला होता.

### चलनी नोटांवर शिक्के-सह्या-लिखाण नको

चलती नोटांवर बँकांनीं, फर्म्सनीं आणि नागरिकांनीं कसलेहि शिक्के मारू नयेत किंवा त्यांवर कांहींहि लिहूं नये, अशी सूचना मध्यवर्ती सरकारनें एक प्रेस नोटचे द्वारां केली आहे. अशा शिक्यामुळें आणि लिखाणामुळें नोटा लवकर खराब होऊन जातात. सहाजीकच जास्त कागदाची आयात करावी लागते, आणि नोटा छापण्याचा खर्चहि वाढतो.

श्री. चा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?

महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग


तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंपस्


१" ते ४" बेल्ट ड्राईव्ह व डायरेक्ट कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंपस्, हँड रहाट इ. इ.
— न्यू. विजय इंडस्ट्रीज लि. —
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

# दि सांगली बँक लि.

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ६,५०,००० चे वर |
| रिझर्व्ह फंडस् | रु. १०,००,००० चे वर |
| खेळतें भांडवल | रु. ४ कोटींचे वर |

★ महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत मिळून एकूण २३ शाखा

★ आकर्षक दरानें ठेवी स्वीकारल्या जातात व सर्व प्रकारचे बँकिंगचे अद्ययावत् व्यवहार योग्य तऱ्हेनें केले जातात.

★ हेड ऑफिस सांगली व इचलकरंजी, रविवार पेठ–पुणें आणि बेळगांव या शाखांमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस्‌ची सोय करण्यांत आली आहे.

अधिक माहितीसाठी नजिकच्या शाखाधिकाऱ्यास अवश्य भेटा.

रजिस्टर्ड ऑफिस
राजवाडा चौक
सांगली.

एम्. के. गुने
M. A., LL. B., C. A. I. I. B.
मॅनेजर.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.